# <u>नियमीत फौजदारी खटला क्रमांक २९२/२०२५ मधील अर्ज निशाणी २६ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज आरोपी क्र.२ ते ४ यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २६२ अन्वये सादर केला असून त्यांना दोषमुक्त करण्याची विनंती केली आहे.

**०२.** अर्ज व त्यावरील सरकारी वकीलांनी सादर केलेल्या खुलाश्याचे अवलोकन केले. तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १९३ अन्वये सादर दोषारोप पत्र व त्यासोबतच्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. उभय पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकला.

**०३.** आरोपी क्र.२ ते ४ यांचे असे कथन आहे की, सदर प्रकरणामध्ये त्यांचेविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११८(२), ११५(२), ३५२, ३५२(२), ३५१ (३) सहकलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल असून तपास पुर्ण होवुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

**०४.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, सदर गुन्हा हा तिचेविरुद्ध खोटा गुन्हा दाखल केला आहे. त्यांचा प्रस्तुत गुन्हयाशी कोणताही संबंध नाही. फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. त्यांचेविरुद्ध त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी करुन आमचे घरात राहायचे नाही असे म्हणुन हाताने मारहाण केली असा आरोप केलेला आहे. परंतु, त्याबाबत कोणताही पुरावा अथवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. फिर्यादी ही दि.१५/०५/२०१६ पासुन माहेरी राहत असुन आरोपी क्र.१ ने फिर्यादीविरुद्ध मा. दिवाणी न्यायालय व. स्तर राजगुरुनगर या न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केलेला असुन सदर अर्ज प्रलंबीत आहे. त्यानंतर तीन वर्षानंतर फिर्यादीने आरोपी क्र.१ विरुद्ध या न्यायालयात कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनीयम अन्वये फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६२२/२०२२ हे प्रकरण दाखल केले असुन सदर प्रकरण देखील प्रलंबीत आहे. दहा वर्षापासुन फिर्यादी माहेरी राहत असुन तिने दि.१५/०५/२०२५ रोजी आरोपींना

खोटया गुन्हयात गोवण्याच्या उद्देशाने खोटी फिर्याद दिलेली आहे. फिर्याद देण्यास दहा दिवसांचा विलंब झालेला आहे.

**०५.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, दोषारोपपत्रामध्ये दाखल साक्षीदार गिता गजबे, उज्वला जाधव व वंदना वाळुंज या स्वतंत्र साक्षीदारांनी दि.१५/०५/२०२५ रोजी आरोपी क्र.२ ते ५ हे त्यांचेसोबत सकाळी ९.४५ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत कामाला होते व त्यांनी फिर्यादीस कोणतीही मारहाण केलेली नाही असा पोलीसांना जबाब दिलेला आहे. त्यामुळे आरोपी क्र.२ ते ४ यांचा सदर गुन्हयाशी कोणताही संबंध नाही. त्यांना प्रस्तुत गुन्हयात खोटे गोवलेले आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दोषारोप ठेवण्याइतपत प्रथमदर्शनी पुरावा नाही त्यामुळे ते दोषमुक्त होणेस प्राप्त आहे.

**०६.** याउलट अभियोग पक्षातर्फे सदर अर्जास हरकत घेण्यात आली. सदर आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा अभिलेखावर दाखल आहे. आरोपींनी केवळ खटल्याचे काम प्रलंबीत ठेवण्याच्या उद्दशाने प्रस्तूतचा खोटा अर्ज दाखल केला आहे.

**०७.** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम २६२ अन्वये जेव्हा भारतीय न्याय संहिता कलम १९३ अन्वये दाखल पोलीस अहवाल व त्याबरोबर सादर केलेले दस्तऐवज यांचा विचार केल्यावर आणि दंडाधिका–यास वाटेल अशी आरोपीची तपासणी केल्यावर आणि दोन्ही पक्षांनी म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावर जर दंडाधिका–यास आरोपी विरुध्द केलेला आरोपी निराधार वाटला तर दंडाधिकारी आरोपीला आपली कारणे नमूद करुन विना दोषारोप मुक्त करु शकतो. सदर कलमांन्वये आरोपी तर्फे सादर करण्यात आलेल्या अर्जाचा विचार करता केवळ पोलीस अहवाल व त्यासोबतचे दस्तऐवज यांचेच अवलोकन करता येईल. सदर अहवाल व दस्तऐवज यावरुन आरोपीविरुध्दचा आरोप निराधार आहे असे दिसून आल्यास आरोपीस विना दोषारोप मुक्त करता येईल. त्याअनुषंगाने प्रस्तूत खटल्यात आरोपीविरुध्द केलेले आरोप निराधार आहे किंवा नाही किंवा आरोपी विरुध्द दोषारोप ठेवण्याइतपत पुरावा आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे.

०८.  प्रस्तूत खटल्यामध्ये आरोपींविरुध्द असा दोषारोप आहे की, दि.१५/०५/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मौजे नांदुर, जाधवस्थळ, ता. आंबेगाव, जि.पुणे येथे आरोपी क्र.१ ने फिर्यादीस सोडचिठ्ठी देण्याच्या कारणावरुन लाकडी दांडक्याने, हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन जबर दुखापत केली. तसेच आरोपी क्र.२ ते ४ यांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन दुखापत केली तसेच शिवीगाळ दमदाटी केली. वरील कथनावरुन असे दिसुन येते की, आरोपी क्र.२ ते ४ यांनी फिर्यादीस हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली. तसेच फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी केली. वरील आरोपी क्र.२ ते ४ यांचेविरुध्दचे आरोप लक्षात घेता त्यांचे विरुध्दचे आरोप हे निराधार आहे असे म्हणता येणार नाही. तसेच फिर्यादीने आरोपीविरुद्ध दाखल केलेला गुन्हा खोटा आहे किंवा नाही ही बाब पुराव्याअंती निश्चित होवु शकले. तसेच फिर्याद दाखल करण्यास झालेल्या विलंब देखील पुराव्याअंती ठरवता येईल. दोषारोपपत्र व त्यासोबत दाखल कागदपत्रांवरुन आरोपी क्र. २ ते ४ विरुद्ध दोषारोप ठेवता येईल इतपत पुरावा असल्याचे दिसुन येते. त्यामुळे निश्चीतच आरोपी क्र.२ ते ४ विरुध्द दोषारोप ठेवता येईल असा प्रथमदर्शनी पुरावा असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत आरोपी क्र. २ ते ४ हे दोष मुक्ततेस पात्र ठरत नाही. सबब प्रस्तूतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. २६ नामंजूर करण्यात येत आहे.

SANTOSH LAXMAN VAIDYA
Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2026.08.11 13:23:01 +0530

घोडेगाव  (संतोष. ल. वैद्य)

दिनांक ११/०८/२०२६  न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, घोडेगाव

ता. आंबेगाव, जि.पुणे.